**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.४२/२०२६ मधील नि.क्र.१ वरील आदेश**

**(राजेंद्र लोखंडे वि. महाराष्ट्र सरकार)**

**MHSO110005542026**

१. प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम ५०३ प्रमाणे जप्त मिळकतीचा अंतरिम ताबा मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे कथन असे आहे की, जप्त मिळकत ही तीन तोळे वजनाची सोन्याची चैन, तीन तोळे वजनाची सोन्याचे ब्रासलेट, साडे चार ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी पोलीसांनी अकलुज पोलीस ठाण्यातील गु.र.क्र. ४६/२०२६, बी.एन.एस २०२३ चे कलम ३०९(४), ३(५) अन्वये दाखल असलेल्या गुन्हयात जप्त केले आहे. त्याबाबत अर्जदाराने अकलुज पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. अकलुज पोलीसांनी चोरी झालेल्या सोन्याची चैन, सोन्याचे ब्रासलेट, सोन्याची अंगठी आरोपीच्या ताब्यातुन जप्त केला आहे. सदर दागिने हा अर्जदार याच्या मालकीचे आहेत. अर्जदारास सदर दागिने ताब्यात दिल्यास तो त्यामध्ये काहीही फेरबदल करणार नाही व न्यायालयाने घातलेल्या सर्व अटींचे पालन करण्यास तयार आहे. त्यामुळे अर्जदाराने सदर दागिनेचे अंतरिम ताबा मिळावा अशी विनंती केली आहे.

३. सदर कामी सहाय्यक सरकारी अभियोक्ता, तपासिक अंमलदार आणि आरोपी यांचे म्हणणे मागविण्यात आले.

४. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी म्हणणे दाखल करुन सदर मुद्देमाल अर्जदारास हरकत असल्याचे सांगितले. तपासी अंमलदाराने म्हणणे दाखल करुन सदर सोन्याचे दागिने अर्जदारास योग्य त्या अटी व शर्तीसह परत देण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे. आरोपी यांनी म्हणणे दाखल केले नाही त्यामुळे विनाम्हणणे अर्ज चालविण्यात आला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदार व सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकला.

६. अर्जदाराने जप्त मुद्देमालाच्या मालकीबाबत अभिलेखावर प्रथम खबर अहवाल, अर्जदाराचे आधारकार्ड व खरेदी पावती या कागदपत्रांच्या प्रती दाखल केल्या आहेत.

७. अर्जदाराने जप्त मुद्देमालाबाबत मालकी दर्शविणारी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. त्याचप्रमाणे तपासी अंमलदार अर्जदाराची मालकी नाकारलेली नाही. प्रस्तुत प्रकरणात जप्त मुद्देमालाची मालकी सिध्द करणे अपेक्षितही नाही. केवळ अर्जदार अंतरिम ताब्यास पात्र आहे किंवा कसे हाच या अर्जातील मुख्य मुद्दा आहे. अशा परिस्थितीत तपासी अंमलदार यांनी अर्जास हरकत घेतलेले नाही. जप्त मुद्देमाल हा मौल्यवान आहे. अशा परिस्थितीत जप्त मुद्देमाल प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत अर्जदाराच्या ताब्यात देणे न्यायोचित ठरेल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज खालील अटी व शर्तीसह मंजुर करण्यात येतो. |
| २. | तपासी अंमलदार, पोलीस ठाणे, अकलुज, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांना असा आदेश देण्यात येतो की, अकलुज पोलीस ठाण्यातील गु.र.क्र.४६/२०२६ अंतर्गत जप्त करण्यात आलेला सोन्याचा ३ तोळे वजनाचे सोन्याची चैन, ३ तोळे वजनाची सोन्याचे ब्रासलेट, साडे चार ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी अर्जदाराने रु.३,२३,०००/- (रु. तीन लाख तेवीस हजार केवळ) एवढया रकमेचे हमीपत्र दिल्यानंतर अर्जदाराच्या ताब्यात दयावा. |
| ३. | अर्जदाराने सदर दागिने हा न्यायालय आदेशीत करेल तेव्हा न चुकता न्यायालयात हजर करावा. |
| ४. | अर्जदाराने सदर मुद्देमालाच्या मुळ स्वरुपात संबंधित गुन्हयाच्या खटल्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत कोणताही बदल करु नये. |
| ५. | अर्जदाराने सदरचा दागिने संबंधित गुन्हयाच्या खटल्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत कोणत्याही मार्गाने अथवा पर्यायाने कोणत्याही व्यक्तीस हस्तांतरित करु नये अथवा वापरण्यास देऊ नये. |
| ६. | तपासी अंमलदाराने जप्त मुद्देमालाचा ताबा अर्जदारास देताना त्याबाबत २ पंचांसमक्ष रितसर पंचनामा करुन पंचनामा करतानाची आणि त्याची सर्व बाजुंची सदयस्थिती दर्शविणारी छायाचित्रे काढावी. सदर पंचनाम्यावर आणि छायाचित्रांवर अर्जदाराची स्वाक्षरी घ्यावी. तसेच त्याने दागिने अर्जदारास देण्यापुर्वी त्याची कोणत्याही प्रतिष्ठीत |

| | |
|---|---|
| | सराफी व्यावसायिकाकडुन रितसर तपासणी करुन घेऊन त्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवावे. त्यानंतर तपासी अंमलदाराने सदर पंचनामा, प्रमाणपत्र आणि छायाचित्रे दोषारोपपत्रासह **न चुकता न्यायालयात दाखल करावी**. (पंचनामे व छायाचित्रे न्यायालयात जमा न केल्यास त्याच्या होणाऱ्या परिणामास संबंधित तपासी अंमलदार सर्वस्वीपणे जबाबदार राहिल). |
| ७. | वरीलप्रमाणे संबंधितांना सुचित करण्यात यावे. |
| ८. | वरीलप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येतो. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GULFARAZ MAQSOOD BIRADAR
Date: 2026.03.25 18:04:40 +0530

दिनांक – २५.०३.२०२६

**(जी. एम. बिरादार)**

३रे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, माळशिरस.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file/order is same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| a) Name of the Stenographer | : | P. S. Kore (Grade III) |
| b) Court | : | $3^{rd}$ Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Malshiras. |
| c) Order signed by P.O. on | : | 25/03/2026 |
| d) Order uploaded on | : | 25/03/2026 |